आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
०८ डिसेंबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देश आत्मनिर्भर बनावा तसंच २०४७मध्ये विकसित भारताचं स्वप्न पूर्ण व्हावं, असा लोकसभेत ‘वंदे मातरम’वरील चर्चेला सुरुवात करताना प्रधानमंत्र्यांच्या पुनरूच्चार

- महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला नागपुरात सुरुवात; ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

- गोवा इथल्या क्लबमधे लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी चार जणांना अटक

**आणि**

- एक कोटीचं बक्षीस असलेल्या नक्षली नेत्यासह बारा नक्षलवाद्यांचं छत्तीसगडमधे आत्मसमर्पण

**<><><><><>**

वंदे मातरम हे गीत आपली उर्जा आणि प्रेरणा बनावं, देश आत्मनिर्भर बनावा आणि २०४७मध्ये विकसित भारताचं स्वप्न पूर्ण व्हावं, या स्वप्नाचा पुनरुच्चार करण्याची संधी या गीताच्या दीडशेव्या वर्षपूर्तीने दिली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत वंदे मातरम गीतावरच्या चर्चेला सुरूवात करताना ते बोलत होते.

ज्या मंत्राने, जयघोषाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला उर्जा आणि प्रेरणा दिली होती, त्यागाचा आणि तपश्चर्येचा मार्ग दाखवला होता, त्या वंदे मातरम गीताचं स्मरण करणं हे आपलं सौभाग्य आहे. या गीताच्या दीडशेव्या वर्षपूर्तीचे आपण साक्षीदार बनत आहोत. हा असा कालखंड होता, जेव्हा इतिहासातले अनेक प्रेरणादायी अध्याय आपल्या समोर आले. नुकताच आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आणि आता आपण या गीतातून मिळणाऱ्या उर्जेची सामूहिक अनुभूती घेत आहोत, असं मोदी म्हणाले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांसाठी वंदे मातरम हाच उर्जामंत्र होता असं मोदी म्हणाले....

**होल्ड... बाईट - प्रधानमंत्री**

वंदे मातरमच्या सुवर्ण महोत्सवावेळी देश गुलामीत जगत होता. शतक महोत्सवावेळी आणीबाणीच्या संकटात होता. याच काळात देशाच्या संविधानाची गळचेपी होत होती. देशासाठी काम करणाऱ्यांना तुरुगंवास होत होता. देशात एक काळा कालखंड सुरू होता. पण आता दीडशेवं वर्षं हे त्या उर्जेला पुनर्स्थापित करण्याचं वर्ष आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. याच गीताने १९४७मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं होतं. या मंत्राने प्रेरित झालेल्या अनेकांनी केलेल्या आंदोलनामुळेच आपण आज इथे बसलो आहोत. त्यामुळे सर्व लोकप्रतिनिधींना या गीताच्या ऋणाचं स्मरण करण्यासाठी ही संधी आहे, असं आवाहन मोदी यांनी यावेळी उपस्थित सदस्यांना केलं.

बंगालच्या पवित्र भूमीने भारताला फक्त वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत नाही, तर देशाला त्याचं राष्ट्रगीतही दिलं, असं प्रतिपादन काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी या चर्चेदरम्यान केलं.

**<><><><><>**

माय भारत पोर्टलवर दोन कोटींहून अधिक तरुणांची नोंदणी झाली आहे, अशी माहिती युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी दिली आहे. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना मांडवीय म्हणाले की, भारतातल्या तरुणांना राष्ट्र उभारणीत सक्षम करण्यासाठी आणि सहभागी करून घेण्यासाठी निर्माण केलेलं माय भारत हे एकछत्री व्यासपीठ आहे. एनसीसी, एनएसएस आणि स्काउट गाईड या व्यासपीठाखाली काम करत आहेत. राष्ट्रीय युवा कॉर्प्स योजनेअंतर्गत १३ हजार २०० पेक्षा जास्त तरुणांची भरती केली जात असल्याची माहिती केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

मिझोरामचे माजी राज्यपाल दिवंगत स्वराज कौशल यांना आज राज्यसभेने श्रद्धांजली वाहिली. ४ डिसेंबर रोजी त्यांचं निधन झालं. स्वराज कौशल यांच्या निधनामुळे देशाने एक दयाळू व्यक्तिमत्त्व, प्रतिष्ठित विधीज्ञ आणि एक सक्षम प्रशासक गमावल्याची भावना राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केली. सभागृहातल्या सदस्यांनी काही क्षण मौन पाळून कौशल यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

मोदी सरकारच्या धोरणामुळे गेल्या ११ वर्षात सामाजिक न्यायाची मूळ भावना प्रत्यक्षात साकार होत असल्याचं दिसत आहे , असं कायदे आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सांगितलं. ते नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. मुद्रा योजनेमुळे देशातल्या नागरिकांची आर्थिक क्षमता वाढली असून सुमारे २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले आहेत, असं त्यांनी सांगितलं. सरकार कच्च्या घरांचं रूपांतर पक्क्या घरात करत असून प्रत्येक घरात वीज जोडणी आणि शौचालय उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपुरात सुरू झालं. वंदे मातरम् आणि राज्यगीत गायनानं दोन्ही सभागृहांच्या कामकाजाला सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी दोन्ही सभागृहांमधे २०२५-२०२६ या वर्षासाठी ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या.

विधानसभेत तालिका अध्यक्ष म्हणून चैनसुख संचेती, समीर कुणावार, किशोर पाटील, सरोज अहिरे, राहुल पाटील, उत्तम जानकर आणि रामदास मसराम यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली.

काँग्रेस नेते नाना पटोले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी हे अधिवेशन वाढवून देण्याची मागणी अध्यक्षांकडे केली. विधिमंडळाचं कामकाज गुंडाळण्याचा प्रयत्न करण्यात येत असून कामकाज घाईघाईनं उरकलं जात आहे, असा आरोप पटोले यांनी केला.

यावर विधिमंडळाचं अधिवेशन आणि कामकाज यावर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वसंमतीनं निर्णय होतो, त्यामुळे आता त्यावर वेगळी चर्चा होणार नाही, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. तर आचारसंहितेमुळे हे अल्पकालीन अधिवेशन असल्याचं स्पष्ट करून हा कालावधी पुढील अधिवेशनात भरून काढू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

यानंतर विधानसभेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

विधानपरिषदेत तालिका अध्यक्ष म्हणून अमित गोरखे यांची निवड करण्यात आली. तसंच अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, सुनील शिंदे, कृपाल तुमाने यांची तालिका सदस्यपदी निवड झाल्याची घोषणा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, पणन मंत्री, ग्रामविकास मंत्री, कामगार मंत्री यांनी अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवले. त्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून कामकाज  दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

महाराष्ट्राच्या महाधिवक्तापदी ज्येष्ठ विधिज्ञ मिलिंद साठे यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. नागपूर इथं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेलाही मंत्रिमंडळानं मजुरी दिली. यामुळे आता शेत रस्ते तयार करण्यासाठी १०० टक्के यंत्रसामुग्रीचा वापर करता येणार आहे. परिणामी, शेतकऱ्यांना पेरणी, कापणी आणि शेतमाल बाजारात नेण्यासाठी बारमाही मजबूत रस्ते उपलब्ध होणार आहेत.

<><><><><>

गोवा इथल्या एका क्लबमधे लागलेल्या आगीमधे २५ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी आज चार जणांना अटक केली आहे. यात अरपोरा नाईट क्लबच्या जनरल मॅनेजरचा समावेश आहे. क्लबच्या मालकासह मॅनेजर आणि आयोजकावर गुन्हा दाखल झाल्यानंतर ही अटक करण्यात आली आहे. नाईटक्लबला २०१३ मधे व्यापार परवाना दिल्याप्रकरणी अरपोरा-नाओआ ग्रामपंचायतीच्या सरंपचालाही ताब्यात घेण्यात आलं आहे.

दरम्यान, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन वार्ताहर परिषदेत बोलताना दिलं आहे.

<><><><><>

नक्षली संघटनेच्या केंद्रीय कमिटीचा सदस्य रामाधर माज्जी याच्यासह बारा नक्षलवाद्यांनी छत्तीसगड पोलिसांसमोर आज आत्मसमर्पण केलं. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड विभागातल्या नक्षली चळवळीला यामुळे मोठा धक्का बसल्याचं मानलं जात आहे. रामाधर माज्जी याच्यावर एक कोटीचं इनाम होतं. एके ४७ रायफलसह रामाधरने पोलिसांसमोर शरणागती पत्करली.

<><><><>

इस्रायलबरोबरच्या युद्धविरामाचा एक भाग म्हणून आपल्याकडची शस्त्रं गोठवण्याची किंवा त्यांचा साठा न करण्याची हमासची तयारी आहे, अशी भूमिका हमासच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानं मांडली आहे. कतारची राजधानी दोहा इथं या युद्धविरामाच्या कराराचा दुसरा आणि अधिक गुंतागुंतीचा टप्पा सुरू होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर, पॅलेस्टिनी देशाच्या उभारणीच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून हमास शस्त्रं खाली टाकायला तयार आहे, असं हमासच्या राजकीय विभागाचे सदस्य बास्सेम नईम यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. तसंच, याबाबतच्या चर्चेसाठी ५ किंवा १० वर्षं युद्धविरामाची गरज असल्याचं मत मांडलं. अमेरिकेच्या पुढाकारानं झालेल्या या युद्धविरामाच्या दुसऱ्या टप्प्यात युद्धग्रस्त गाझाचं भविष्य ठरवणं, अशी परिस्थिती हाताळण्यासाठी आंतरराष्ट्रीय सुरक्षादल नियुक्त करणं, गाझामध्ये पॅलेस्टाइन समिती स्थापन करणं, गाझाची पुन्हा उभारणी करणं, इस्रायली सैन्य या भागातून मागे घेणं, तसंच हमासचं निःशस्त्रीकरण इत्यादी मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

<><><><>

एफआयएच हॉकी पुरुष कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत जर्मनीनं भारतावर ५-१ अशा मोठ्या फरकानं मात केली. भारताकडून अनमोल एक्का यानं एकमेव गोल केला. आता भारताचा कांस्यपदकासाठीचा सामना बुधवारी अर्जेंटिनाविरुद्ध होईल, तर अंतिम फेरीत जेतेपदासाठी जर्मनीसमोर स्पेनचं आव्हान असेल.

<><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्या दरम्यानच्या तीन सामन्यांच्या हॉकी मालिकेच्या पहिल्या सामन्यात काल भारतानं दक्षिण आफ्रिकेवर ५-२ अशी मात केली. शैलानंद लकरा, आदित्य ललगे, अमित रोहिदास, हरमनप्रीत सिंह आणि दिलप्रीत सिंह यांनी भारतासाठी गोल केले. मालिकेतला दुसरा सामना आज रात्री साडेआठ वाजता केपटाऊन इथं होणार आहे. जागतिक क्रमवारीत भारत सध्या सातव्या, तर दक्षिण आफ्रिका १२व्या स्थानावर आहे.

<><><><>

एआयएफएफ सुपर कप फुटबॉल स्पर्धेचं जेतेपद गोवा फुटबॉल क्लबनं पटकावलं. गोव्याच्या मडगांव इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी पूर्व बंगाल फुटबॉल क्लबवर

६-५ अशी मात केली. निर्धारित वेळेत दोन्ही संघांना एकही गोल न करता आल्यानं सुपर कपच्या इतिहासात पहिल्यांदाच पेनल्टी शूटआऊटनं सामन्याचा निर्णय झाला.

**//<><><><><>//**